करण जोहरच्या गाजलेल्या 'कुछ कुछ होता हैं' सिनेमाच्या रिमेकची बॉलिवूडमध्ये नेहमी चर्चा असते. हा सिनेमा बनेल तेव्हा बनेल पण सिनेमा बनला तर त्यात कोण असेल याची चर्चा करायला करण जोहरला फार आवडते. आधी त्याला शाहरुख च्या म्हणजेच सिनेमातल्या राहुलच्या भूमिकेसाठी रणबीर कपूर फीट वाटत होता; पण आता तो रणवीस सिंहचे नाव घेतो.





# 'कुछ कुछ होता हैं' च्या रिमेकमध्ये रणबीरऐवजी रणवीर?

अलीकडेच करणला 'कुछ कुछ होता हैं' च्या रिमेकच्या स्टारकास्टबद्दल विचारले तेव्हा त्याने राहुलच्या भूमिकेसाठी रणवीर सिंहचे नाव घेतले. आधी तो रणबीर कपूर, आलिया आणि जान्हवी या तिघांची नावे या सिनेमातल्या मुख्य पात्रांसाठी घेत होता. कुछ कुछ होता हैं ला २० वर्ष पूर्ण झाल्याने मेलबर्न इंडियन फिल्म फेस्टीव्हलमध्ये या सिनेमाचा प्रिमिअर ठेवण्यात आला होता.